# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवाये समर्पित

फोनं नं. (०२४०)-२३३३५३६-४०
फॅक्स नं. (०२४०) २३३१२१३

बेटी बचाओ
save the girl child


जा.क्र./मनपा/उअ/पापु /जास्था/ ८०२ /२०१५ दिनांक :-२३ /१२ /२०१५

## बैठकीचे इतिवृत्त

| | |
|---|---|
| प्रकल्प | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना:- समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्प |
| बैठकीची कार्यसुची | समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्प - संपूर्ण प्रकल्पाचा विश्लेषणात्मक आढावा |
| प्राधिकरण | औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद |
| कन्सेशनर | औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लिमीटेड (ACWUCL) |
| संदर्भ | दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी महानगरपालिका व कन्सेशनर यांचे सोबत झालेले कन्सेशन ॲग्रीमेंट |
| बैठकीचा दिनांक व वेळ | ०७ डिसेंबर २०१५, सकाळी १०.०० वाजता |
| बैठकीचे स्थळ | मुख्य प्रशासक, सिडको, औरंगाबाद यांचे मुख्य कार्यालय |
| अध्यक्ष | आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद |

**बैठकीला खालीलप्रमाणे उपस्थिती होती :**

| अ.क्र. | नाव | पद आणि कंपनी |
|---|---|---|
| १. | एस.डी. पानझडे | शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद |
| २. | एच.ए. कोल्हे | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ३. | ए.ए. थोरात | मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद |
| ४. | यु.जी. शिरसाठ | उप अभियंता, पाणी पुरवठा, जायकवाडी (यांत्रिकी,) महानगरपालिका औरंगाबाद |
| ५. | के.एम. फालक | प्र. उप अभियंता, पाणी पुरवठा, जायकवाडी (स्थापत्य,) महानगरपालिका औरंगाबाद |
| ६. | अशोक पद्मे | प्र. उप अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ७. | के.पी. धांडे | शाखा अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ८. | बी.डी. घुले | शाखा अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ९. | एस.पी. जोशी. | शाखा अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| १०. | एम.एम. बाविस्कर | दुय्यम आवेक्षक, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद |
| ११. | आशीष पोरवाल | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १२. | अमीत बेरा | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १३. | महेश देशपांडे | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १४. | एस.ए. खडायते | ACWUCL यांचे प्रतिनिधी |



23/12/15

| | | |
|---|---|---|
| १५. | विरसंग स्वामी | ACWUCL यांचे प्रतिनिधी |
| १६. | आर.बी. होनकळसे | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| १७. | विजय इंगोले | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| १८. | वीपीन हटकर | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| १९. | वैभव धोटे | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |
| २०. | अशोक कुमार | स्वतंत्र अभियंता यांचे प्रतिनिधी |

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीची कार्यसुची सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून दिली. यापुर्वी संपन्न झालेल्या तीन बैठकांमधील चर्चेनुषंगाने आजच्या बैठकीमध्ये समांतर जलवाहिनी योजनेच्या आर्थिक, तांत्रिक बाबीं विषयी सखोल विश्लेषणात्मक चर्चा होणार असल्याचे नमूद केले. त्यानुषंगाने खालील मुद्दयांवर सविस्तर चर्चा झाली.

- शहरामध्ये असलेल्या अवैध नळ जोडण्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेमध्ये महानगरपालिकेचे मोठ्याप्रमाणात महसुली नुकसान होत आहे. याबाबत आयुक्त यांनी आजमीतीस असलेल्या नळ जोडण्यांची संख्या तसेच कन्सेशनर मार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची सविस्तर माहिती घेतली. महानगरपालिकेच्या नोंदीवर १११००० नळजोडण्या असून महानगरपालिका हद्दीत २९२००० मालमत्ता (House Hold) आहेत. यात जलवाहिनी नसलेल्या भागाचाही समावेश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावर आयुक्त यांनी जलवाहिनी असलेल्या भागातील मालमत्तांचे सविस्तर विवरण देण्याबाबत आदेशीत केले. त्याचप्रमाणे पाणीपट्टीची होत असलेली वसुलीबाबतही माहिती घेतली. चर्चे अंती असे निदर्शनास आले की, महानगरपालिकेकडे असलेल्या नोंदी व्यतिरिक्त जवळपास १००००० अवैध नळ जोडण्या आहेत. या अवैध नळ जोडण्यांमुळे पाणी पुरवठा वितरणात विस्कळीतपणा येत असून वैध नळ जोडणीधारकांना यामुळे आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. अवैध नळजोडण्या वैध करण्यासाठी महानगरपालिका व कन्सेशनर यांचेतर्फे अभय योजना राबविली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले असता आयुक्त यांनी अभय योजनेची कार्यवाही बाबत माहिती घेतली. अवैध नळ जोडणी नियमित करण्यासाठी मागील पाणी वापराचा विचार न करता फक्त १००० रुपये दंड आकारण्यात येत असल्याने आयुक्त यांनी नाराजी व्यक्त करुन सदर योजनेला यापुढे दिनांक ३१ डिसेंबर २०१५ नंतर मुदतवाढ न देता नियमानुसार कार्यवाही करावी असे आदेश आयुक्त यांनी दिले. या संदर्भाने आयुक्त यांनी बैठकी मधुन मा. महापौर यांना दुरध्वनीवर चर्चा करुन या संदर्भाने माहिती दिली. उक्त बाबीला मा. महापौर यांनी प्राथमिक दृष्ट्या सहमती दर्शविली.

- विद्युत देयका संदर्भाने ACWUCL यांनी सादर केलेल्या Open Access च्या प्रस्तावाला मान्यता मिळावी अशी विनंती कंपनीचे प्रतिनिधी यांनी केली. कन्सेशन ॲग्रीमेंट मधील तरतुदींनुसार विद्युत देयकाचा दर ठरविण्यात आलेला असून या दरापेक्षा जास्तीची आकारणी झाल्यास या जास्तीच्या आकारणीची अदाईगी महानगरपालिकेस करावी लागते. Open Access मध्ये प्रस्तावीत दर हे विज कंपनीच्या प्रचलीत दरांपेक्षा कमी असल्याने कंपनीला त्याचा साधारणत: १५% आर्थिक फायदा होणार आहे. तसेच महानगरपालिकेस देखील जास्तीच्या रकमेची अदाईगी करावी लागणार नाही असे कन्सेशनरतर्फे नमुद करण्यात आले. आयुक्त यांनी या संदर्भाने कन्सेशनरला जर आर्थिक फायदा होत असेल तर त्याचा पूर्ण लाभ महानगरपालिकेला मिळणे आवश्यक असल्याची बाब नमूद केली.



23/12/15

- आयुक्त यांनी समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत प्रस्तावीत नविन संतुलन जलकुंभाची आवश्यकता, क्षमता, बांधकामासाठी लागणारा खर्च इत्यादी बाबींविषयी सविस्तर माहिती घेतली. प्रस्तावीत उंच पातळीवरील संतुलन जलकुंभामुळे शहर वितरण प्रणाली अंतर्गत सद्यस्थितीत असलेले १० बुस्टर पंपींग स्टेशन पैकी फक्त ४ पंपींग स्टेशन कार्यरत राहणार आहेत आणि यामुळे देखभाल दुरुस्ती व विद्युत देयकांचा खर्च कमी होणार आहे. कमी होणारा खर्च व नविन संतुलन जलकुंभ बांधण्यासाठी लागणारा खर्च याचा विचार करता ३.६ वर्षांचा payback period बाबतच्या विवरणावर चर्चा झाली. संतुलन जलकुंभ उंच पातळीवर घेतल्यामुळे जलशुध्दीकरण केंद्र येथून होणाऱ्या पंपींगसाठी लागणारी अतिरिक्त HP व खर्च विचारात घेऊन गणिते मांडावीत अशा सुचना आयुक्त यांनी दिल्या.

  पाणी पुरवठा योजनेमध्ये संतुलन जलकुंभ हा महत्वाचा घटक असून मुख्य योजनेत २ ते ४ तास क्षमतेचा व्यत्यय आल्यास त्याचा परिणाम शहर पाणी पुरवठ्यावर होऊ नये या करीता संतुलन जलकुंभ असणे गरजेचे आहे. अस्तीत्वातील संतुलन जलकुंभास १२१९ मिमी व्यासाचे एक Inlet असून या जलकुंभातुन १२०० मिमी व १४०० मिमी व्यासाचे दोन Outlet असल्याने संतुलन जलकुंभामध्ये पाणी पातळी स्थिर राहत नाही. तसेच वितरण प्रणाली अंतर्गत असलेले जलकुंभ हे ६१० ते ६११ मीटर पातळीवर आहेत. अस्तीत्वातील संतुलन जलकुंभाची पाणी पातळी ही ६२८.०० मीटर आहे. वितरण प्रणाली व्यय लक्षात घेता या जलकुंभांना योग्य प्रमाणात व योग्य दाबाने पाणी पुरवठा होत नसल्याचेही आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. या सर्व बाबींचा विचार करता अस्तीत्वातील संतुलन जलकुंभांच्या पातळी पेक्षा उंच पातळीवर संतुलन जलकुंभ बांधण्यात यावा असा निर्णय बैठकीमध्ये घेण्यात आला.

- आयुक्त यांनी समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत प्रस्तावीत नविन जलकुंभाची संख्या कमी करता येईल का याबाबतीत विचारणा केली. यावर कन्सेशनरचे प्रतिनिधी यांनी शहर वितरण प्रणालीचे हायड्रॉलिक मॉडेल तयार करण्याकरीता नियुक्त करण्यात आलेले संकल्पनार्थी यांना सादरीकरणासाठी बोलावण्यात येईल असे सांगितले. प्राथमिक अभ्यासानुसार अस्तीत्वातील २२ जलकुंभांपैकी १९ जलकुंभांचा समावेश हायड्रॉलिक मॉडेलमध्ये करण्यात आला तर या १९ जलकुंभांद्वारे फक्त ५५००० लोकसंख्येला पाणी पुरवठा करता येईल असे निदर्शनास आणून देण्यात आले. यावर आयुक्त यांनी अस्तीत्वातील जलकुंभांची क्षमता, बांधकाम होऊन झालेला कालावधी तसेच उंची इत्यादी बाबींचा अभ्यास करावा, केवळ बांधकाम कालावधी जास्त झालेला आहे, उंची कमी आहे म्हणून जलकुंभ तोडू नयेत, आवश्यक असेल त्या ठिकाणी अस्तीत्वातील वापर योग्य नसलेले जलकुंभ नियमानुसार मान्यता घेऊन मग तोडून त्याच जागेवर नविन जलकुंभ बांधण्यास हरकत नाही अशा सुचना दिल्या.

- आयुक्त यांनी समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत प्रस्तावीत नविन पंपींग मशिनरी बाबत विस्तृत स्वरुपात माहिती घेऊन स्वत: कोष्टके मांडून प्रस्तावीत पंपांची क्षमता तपासली व सध्या संकल्पन केलेली क्षमता अपुरी असल्याबाबत मत व्यक्त करुन या संदर्भाने त्वरीत आढावा घेऊन पुर्नतपासणी करण्याचे निर्देश दिले.

- आयुक्त यांनी समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत प्रस्तावीत नविन मुख्य उध्दरण वाहिनीची देखील विस्तृत माहिती घेतली. प्रस्तावीत अशुध्द व शुध्द उध्दरण वाहिन्यांकरीता रुपये २९७.०२ कोटी इतका खर्च येणार असल्याने याबाबीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने असलेल्या शक्यतांची पडताळणी करण्यात यावी, भौगोलिक क्षेत्र तसेच पंपांवर असलेले Head याचा अभ्यास करुन जलवाहिनीची जाडी किंवा काही अंतरापर्यंत जलवाहिनीचा व्यास कमी करता येईल काय याबाबत सविस्तर अभ्यास करावा असे निर्देश दिले.



28/12/15

तसेच या संदर्भाने त्वरीत आढावा घेऊन पुर्नतपासणी करण्याचे निर्देश दिले. यावर सदर संकल्पन केलेले मे. शहा टेक्निकल कन्सलटंट यांचे संकल्पनार्थी श्री. पौनीकर (माजी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) यांना महानगरपालिकेमार्फत औरंगाबाद येथे बोलावण्यात यावे अशी चर्चा झाली.

- कन्सेशनर यांनी आतापर्यंत वितरण प्रणाली अंतर्गत २६ किलो मीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकल्या असल्याचे निदर्शनास आणून दिले असता पाणी परिणाम न वाढवता वितरण प्रणालीत वाढ केल्यामुळे आयुक्त यांनी नाराजी व्यक्त करुन दुषित पाणी पुरवठ्याच्या तक्रारी संदर्भानेच जलवाहिन्या बदलाव्यात, नविन जलवाहिन्यांमुळे वितरण प्रणालीत अडचण येत असल्याने पूर्व परवानगी शिवाय नव्याने वितरण प्रणालीत जलवाहिन्या टाकू नयेत असे स्पष्ट निर्देश दिलेत.

- UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर असलेला मुळ प्रस्ताव रुपये ३५९.६७ कोटी व पीपीपी प्रकल्पाअंतर्गत रुपये ७९२.२० कोटी या दोन्ही प्रस्तावाचे आयुक्त यांनी सविस्तर विवरण तपासून योजनेच्या किंमतीत झालेल्या वाढीबाबत माहिती घेतली. मुळ प्रस्तावात शहर वितरण प्रणाली अंतर्गत ढोबळ मानाने ४५५ किलो मीटर लांबीमध्ये जलवाहिन्यांचा समावेश करण्यात आलेला असल्याचे व पीपीपी अंतर्गत संपूर्ण शहराच्या वितरण प्रणालीचा विचार करुन क्रिसील या संस्थेने नेमलेल्या कन्सलटंट यांनी केलेल्या अभ्यासानुसार १२९० किमी लांबीमध्ये जलवाहिनी प्रस्तावीत केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या वाढीव लांबीमुळे प्रकल्प खर्चात रुपये २३८.२९ कोटी इतकी वाढ झालेली आहे असे निदर्शनास आणून देण्यात आले.

- अस्तीत्वातील जलवाहिन्यांबाबतही आयुक्त यांनी सविस्तर माहिती घेतली. अस्तीत्वातील जलवाहिन्यांची लांबी, प्रकार व आयुष्य यावर सखोल चर्चा होऊन अस्तीत्वातील डी आय, सीआय, एम.एस. व एचडीपीई प्रकारच्या साधारणत: १४५ किमी लांबीच्या अस्तित्वातील सर्व जलवाहिन्या तशाच ठेवून हायड्रॉलिक मॉडेल तयार करावे असे निर्देश दिले.

- शहर वितरण प्रणाली अंतर्गत अधिकृत / अनाधिकृत / गुंठेवारी असा फरक न करता वितरण प्रणालीची व्याप्ती संपुर्ण शहरात घ्यावी. शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करणे संदर्भाने मा. सर्वोच्च न्यायालयाने इतर निवाड्यामध्ये आदेश दिलेले असल्यास पारीत केलेल्या आदेशाची प्रत प्राप्त करावी.

- शहर वितरण प्रणाली अंतर्गत बसविण्यात येणाऱ्या जलमापक यंत्राच्या खर्चाबाबतचा तपशील (किंमत) सविस्तररीत्या आयुक्तांना सादर करण्यात आला. यामध्ये मीटरची किंमत रुपये १२०० इतकी असून उर्वरीत रक्कम ही मीटर बॉक्स, गेटव्हॉल्व, नॉन रीटर्न व्हॉल्व, स्पेशल्स व मजुरीचे असल्याचेही निदर्शनास आणून दिले. मीटरचे शुल्क हे पाच वर्षात समान हप्त्याने कन्सेशनर मार्फत वसुल केले जाणार असल्याचे व पाणी वापरानुसार ग्राहकास शुल्क आकारले जाणार असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. मीटरच्या किंमतीबाबत कन्सेशनर यांच्या मुख्य अधिकाऱ्यांशी दिनांक ०९.१२.२०१५ रोजी बैठकीत पुन्हा चर्चा करण्यात येईल असे ठरले. जलमापक यंत्र व एम.डी.पी.ई. पाईपने नळ जोडण्या बदलणे/देणे याबाबत सविस्तर टिपणी तयार करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले.

- समांतर जलवाहीनी प्रकल्पास उपलब्ध होणारे एकूण शासन अनुदान तसेच कन्सेशनर यांना टाकावयाची एकूण रक्कम याबाबतही विस्तृत स्वरुपात चर्चा झाली. या योजनेकरीता एकूण रुपये ३९९.५२ कोटी रुपयाचे अनुदान केंद्र व राज्य शासनामार्फत उपलब्ध होणार असून उर्वरीत रुपये ३९२.६८ कोटी कन्सेशनर यांना



28/12/15

टाकावयाचे आहेत. तथापी रुपये ७९२.२० कोटी ही रक्कम सन २००८-०९ च्या दर सुचीनुसार असुन प्रकल्प हस्तांतरीत करण्यास व प्रत्यक्ष कामे सुरु होण्यास विलंब झालेला असल्याने सन २०१३-१४ च्या दर सुचीनुसार प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता कन्सेशनरमार्फत वर्तविण्यात आली. यावर रुपये ७९२.२० कोटी किंमतीच्या प्रकल्पामध्ये समाविष्ट असलेली सर्व उपांगे कन्सेशनर यांना पुर्ण करणे बंधनकारक असल्याचे महानगरपालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले. निधी उभारण्यासाठी काय कार्यवाही केली अशी विचारणा आयुक्तामार्फत करण्यात आली. निधीची उभारणी करण्यासाठी आय.डी.बी.आय बँकेकडे रीतसर प्रस्ताव सादर केलेला असून बँकेने काढलेल्या त्रृटींची पुर्तता करण्यात येत आहे, अद्याप Financial Closure झाले नसल्याचे कन्सेशनरमार्फत स्पष्ट करण्यात आले.

- कन्सेशनर यांनी सादर केलेल्या Financial Model ची सविस्तर तपासणी करुन कन्सेशनरतर्फे केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीच्या प्रमाणात नफ्याचे प्रमाण जास्त आहे, हा सार्वजनिक व जनहिताचा प्रकल्प असल्याने नफ्याचे प्रमाण अवास्तव आहे असे मत आयुक्त यांनी व्यक्त केले. दिनांक ०९.१२.२०१५ रोजी होणाऱ्या बैठकीत सविस्तर चर्चा करावी असे ठरले.

- आयुक्त यांनी कन्सेशनरमार्फत Appointed Date पासून फक्त वितरण व्यवस्थे अंतर्गत जलवाहिन्या टाकण्यात येत असून नविन योजनेची पाणी पुरवठा जायकवाडी वरुन वाढवण्याची कुठलीही कामे न केल्यामुळे तिव्र नाराजी व्यक्त केली. तसेच जर मुख्य योजनेची कामे करुन पाणी परिमाण वाढविले असते तर नागरीकांचा फायदा होऊन महानगरपालिकेला त्यांच्या रोषास सामोरे जावे लागले नसल्याची बाब नमूद केली. तसेच या संदर्भाने त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

- पाणी पुरवठा योजनेतील हेडवर्क्सच्या कामामध्ये बचत करता येईल काय याबाबत महानगरपालिकेमार्फत उप अभियंता, जायकवाडी यांत्रिकी व कन्सेशनरचे प्रतिनिधी श्री. आशिष पोरवाल यांनी संयुक्त पाहणी करुन या संदर्भाने अहवाल सादर करण्याचे निर्देश बैठकीत दिले.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

Page- 5 of 5

आयुक्त 23/12/15
महानगरपालिका औरंगाबाद